# खापरखेडा ५०० मेगावॅट बॉयलर फिड पंप उभारणी कामाचा शुभारंभ ना.श्री. सुनिल तटकरे यांचे हस्ते संपन्न

२०१२ पर्यत राज्य भारनियमन मुक्त होईल असा विश्वास राज्याचे ऊर्जामंत्री मा.ना.श्री. सुनिल तटकरे यांनी व्यक्त केला. वीजनिर्मिती प्रकल्पासाठी ज्या शेतकऱ्यांनी जमिनी दिल्या त्या प्रकल्पग्रस्त कुटुंबातील एका व्यक्तीला तांत्रिक प्रशिक्षण दिले जाईल, नंतर नोकरी देण्यात येईल. आणि जे प्रकल्पग्रस्त आय.टी.आय. उत्तीर्ण नाहीत त्यांना तंत्रनिकेतन प्रशिक्षणाची सोय करण्यात येईल व विद्यावेतन म्हणून रु २००० देण्यात येतील. विजेची तूट भरुन काढण्याकरिता राज्यात वीज प्रकल्पांचे विस्तारीकरण करण्यात येत आहे. या अंतर्गत खापरखेडा येथील ५०० मेगावॅट प्रकल्प २०१० पर्यत कार्यान्वित होईल. महानिर्मिती अंतर्गत सुमारे ७७०० मेगावॅट क्षमतेच्या वीज प्रकल्प उभारणीचे काम सद्यस्थितीत युध्दपातळीवर सुरु आहे. खापरखेडा येथील ग्रामपंचायतीला भौतिक सुविधा व स्थानिक रेंगाळलेले प्रश्न सोडविण्याच्या दृष्टीकोनातून मी लक्ष घालेन अशी त्यांनी ग्वाही दिली.

कार्यक्रमाच्या प्रसंगी आमदार श्री. सुनिल केदार तसेच महानिर्मितीचे संचालक (संचलन) श्री. मधुकर शेलार, प्रभारी संचालक (प्रकल्प) श्री. अरुण डवलेकर तर खापरखेडा ग्रामपंचायतीचे सरपंच श्री. हेमराज परिहार, सावनेर पंचायत समितीचे उपसभापती श्री. रोशन गावंडे मंचावर प्रामुख्याने उपस्थित होते. प्रारंभी प्रास्ताविकातून श्री. भालचंद्र गोखले, प्रभारी कार्यकारी संचालक (प्रकल्प) २ यांनी सांगितले की, खापरखेडा औष्णिक केंद्र हे तत्कालिन महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळातील प्रथम वीज केंद्र असल्याने ही वीजनिर्मितीची जननी आहे तसेच येथील पहिल्या संचाचे उद्घाटन डॉ. राजेंद्र प्रसाद, तत्कालिन राष्ट्रपती यांच्या हस्ते झाले. यानंतर सद्यस्थितीत २१० मेगावॅटचे ४ संच कार्यरत आहेत. आज टर्बाईन साईड बॉयलर फिड पंप उभारणी कामाचा शुभारंभ होत आहे. ५०० मेगावॅट खापरखेडा प्रकल्पाचे ६० टक्के काम पूर्ण झाले आहे व नियोजित वेळेत प्रकल्प पूर्ण करण्याच्या दृष्टीने आम्ही वचनबध्द आहोत. नागपूर जिल्हयातील ५०० मेगावॅटचा हा पहिलाच प्रकल्प आहे.

खापरखेडा ही एक ऐतिहासिक जागा आहे. येथे खाणी आहेत संसाधन उपलब्ध आहे त्यामुळे येथील विकास होणे गरजेचे आहे. बाजार , आठवडीबाजार व्हायला हवा, मुला-मुलींना चांगले शिक्षण मिळण्याकरिता शैक्षणिक वास्तू उभारायला हवी. खेळण्यासाठी चांगले क्रीडांगण अत्याधुनिक सोयी सुविधां सह व्हायला हवे. वीज कंपनीतील अधिकारी, अभियंते, तंत्रज्ञ आपले कौशल्य पणाला लावून विस्तारीकरणाची कामे जलदगतीने करीत असल्याचे गौरवोद्गार श्री. सुनिल केदार यांनी काढले.

याप्रसंगी महानिर्मितीचे कार्यकारी संचालक (सांघिक नियोजन )श्री. माणिक वाघमोडे, कार्यकारी संचालक (मानव संसाधन) श्री अरविंद चौधरी, महावितरणचे कार्यकारी संचालक श्री. अनिल खापर्डे, मुख्य महाव्यवस्थापक सर्वश्री. अशोक जोहरी, गजानन तुळणकर, शशिकांत डोंगरे, ज्ञानेश्वर थुटूरकर, विजय सिंह, लक्ष्मीकांत कडाव, तलवारे तसेच महाव्यवस्थापक सर्वश्री. विठ्ठल खटारे, अशोक अग्रवाल, सुरेश चिंचाळकर, नारायण बिघाणे, जी.एम.उईके, अधीक्षक अभियंते सर्वश्री. विनोद वैद्य, सुधीर वाटवे, सुरेंद्र नाकाडे, अरविंद पाटणकर, ए.वाय.घुशे, नायक, मुकेवार आदी उपस्थित होते. भारत हेवी ईलेक्ट्रिकल्स लिमिटेडचे श्री. औरंगाबादकर आणि श्री मुखोपाध्याय तर बी.जी.आर. एनर्जी सिस्टमचे श्री. भट्टाचार्य, श्री आयरन श्री. शर्मा तसेच इतर अधिकारीवर्ग उपस्थित होते. श्री. भालचंद्र गोखले यांचे नेतृत्वाखाली खापरखेडा प्रकल्पातील महाव्यवस्थापक श्री. विठ्ठल खटारे आणि श्री. अशोक अग्रवाल यांचे चमूने अतिशय कमी वेळेत हा कार्यक्रम भरगच्च यशस्वी केला. त्याकरिता कार्यकारी अभियंता सर्वश्री. एन.एल.नारखेडे, अनिल गुजर , ए.जी.पेटकर, व्ही.एल. धामनकर, बी.एन. झांबरे. सोनकुसरे, कॉलरा, कावरे, उपकार्यकारी अभियंता-सर्व श्री.पी.एन. मडावी, साठे, बोधनकर, जिचकार, बोरकर, प्रधान, जीवने, विश्वकर्मा, ढोले, कुळकर्णी, सर्व सहाय्यक अभियंते , सर्व कनिष्ठ अभियंते, लेखा विभाग प्रमुख श्री डोडल उपमुख्य लेखाधिकारी सर्व सुरक्षा विभाग, श्री. कोंडेकर, आस्थापना विभाग, खापरखेडा येथील सर्व मान्यवर पत्रकार मंडळी तसेच खापरखेडा गावातील सन्माननीय नागरिकांचे मोलाचे सहकार्य लाभले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. प्रमोद संत यांनी तर आभार प्रदर्शन श्री. गजानन तुळणकर यांनी केले. यानंतर आयोजित पत्रकार परिषदेस मार्गदर्शन करताना नामदार श्री. सुनिल तटकरे यांनी सांगितले की, प्रकल्पग्रस्तांना नोकरीत सामावून घेण्याकरिता प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. याप्रसंगी परिसरातील प्रिंट तथा